
मुक्तस्पंदन
सचिन निकम

# मुक्तस्पंदन

© सर्व हक्क सुरक्षित

**रचनाः सचिन कृष्णा निकम**

पत्ता ः बी 706, मॉन्ट वर्ट ग्रॅन्ड पाषाण सुस रोड

पुणे 411021 .

मोबाइल ः 9890016825

ईमेल ः sachinikam@gmail.com

# अनुक्रमणिका

1 . पांडुरंग हरि गोविंद मुरारी....................................................3

2 . यावे पुन्हा भूमंडळी राजे ....................................................5

3 . मनराज ......................................................... ... . 9

4 . काळ ......................................................... ...... . 11

5 . तुझ्या येण्याने .............................................. ... ...... 15

6 . तू समीप येता...............................................................17

7 . विरहयातना ................................ ...............................19

8 . यशकळस ................................ ...............................23

9 . अर्थाविना काही अर्थ नाही ..................................................25

10 . आम्ही लय भारी ............................................................29

11 . शिनेमाला घेऊन चला .......................................................33

12 . डचळांग मचळांग .............................................................37

13 . म्हणी असाव्या मनी ..........................................................39

14 . पोतराज आला ..............................................................41

15 . नाती..............................................................................45

16 . Remember you...............................................................49

17 . आये खुशियों के पल....................................................... . 51

# अनुक्रमणिका

**18 .** हरिनामसंकीर्तन ..........................................................**53**

**19 .** मेघश्यामल रिमझिमले ..................................................**57**

**20 .** डॉली..........................................................................**59**

**21 .** मराठा .......................................................................**61**

**22 .** गुढीपाडवा...................................................................**63**

**23 .** पहिली नजर.................................................................**65**

**24 .** मैत्री...........................................................................**67**

**25 .** राजकारण...................................................................**69**

## 1. पांडुरंग हरि गोविंद मुरारी

दिनांक ः 03 मार्च 2010

सर्वकारणकारणम् विष्णो भगवान् नमोस्तुते |

पांडुरंग हरि गोविंद मुरारी || धृ.||
शरण तुला देवा, आलो तुझ्या दारी
नित्य घडो देवा, देही तुझी भक्ती
कृपा करो देवा, दे दिव्य शक्ती || 1||

पांडुरंग हरि गोविंद मुरारी
नमन तुला देवा, तूच ईह तारी
अखंड राहो देवा, चित्ती तुझे ध्यान
कृपा करो देवा, दे दिव्य ज्ञान || 2||

पांडुरंग हरि गोविंद मुरारी
भजनी तुझ्या देवा, रमलो वैष्णव सारी
अनंत राहो देवा, आत्मा तुझा सखा
कृपा करो देवा, एक तूचि पाठीराखा || 3||

पांडुरंग हरि गोविंद मुरारी
जैसा भक्तीभाव मनी, तैसा तू उद्धारी
वंदनी श्रीधरा लाभे शांत्य भिष्मा
प्रार्थनी श्रीरामा लाभे दास्य हनुमंता
स्मरणी श्रीकृष्णा लाभे सख्य पार्था
अर्चनी वासुदेवा लाभे वात्सल्य यशोदा
गायनी केशवा लाभे माधुर्य मिरा || **4**||

पांडुरंग हरि गोविंद मुरारी
शरण तुला देवा, आलो तुझ्या दारी
पांडुरंग कीर्तनी दंगलो मी आता
गोविंद चरणी रंगलो मी माथा
माधव पूजनी पावलो जन्म साता
मुकुंद श्रवणी मिळे मुक्ती भक्ता
नारायण चिंतनी हरपली भवचिंता
तारिशी भवसिंधु तूचि जगन्नाथा || **5**||

## 2. यावे पुन्हा भूमंडळी राजे

दिनांक : 31 मार्च 2010

हे हिंदवी स्वराज्य संस्थापिले तुम्ही
शतकोटी नमन आहोत ऋणी आम्ही
समृद्ध संपन्न राष्ट्र महान अपुले
ऐशा पावन भूवरी सौख्य आम्हासी लाभले
आहे आग्रहाचे निमंत्रण माझे
दीपस्तंभापरी मार्गदर्शाया ...
यावे पुन्हा भूमंडळी राजे || धृ .||

कित्येक दशके उलटली, आक्रमणे परक्यांची झाली
मतलबी राज्यकर्त्यांनी अस्मिता गंगेस वाहिली
घुसला भ्रष्टाचार अंगी, पिळती रयतेचा कान
निर्लज्जापरी दिल्लीमध्ये अजूनि झुकविती मान
आहे आग्रहाचे निमंत्रण माझे
स्वाभिमान जागृताया ...
यावे पुन्हा भूमंडळी राजे || 1||

जाहले व्यक्तिस्वातंत्र्य स्मशान
पेटले ऐसे लोकशाहीचे रान
बुजलेले ते नेते कसले
श्रेष्ठींच्या आदेशाला जे समजती शान
विकासाच्या आराखड्यात भरती स्वतःचीच तिजोरी
सामान्यांच्या नशीबी मात्र शिळी शिदोरी
आहे आग्रहाचे निमंत्रण माझे
कडेलोट बुजगावण्यांना ठोठवाया ...
यावे पुन्हा भूमंडळी राजे || **2**||

म्लेंछांनी माजविला अतिरेक
पडती बळी निष्पाप कित्येक
देखते निमूट, हतबल सरकार खेळ
कोणजाने कुठे चुके गुप्तहेरांचा मेळ
शक्तीपरी युक्ती वापराया
गनिमी कावा आम्हा शिकवाया
आहे आग्रहाचे निमंत्रण माझे
दुष्ट प्रवृत्तींना ठेचाया ...
यावे पुन्हा भूमंडळी राजे || **3**||

घुमतोय नाद हर हर महादेव सह्याद्रीतून
गरजतोय प्रतिसाद जय भवानी अंतरातून
फडकतोय दिमाखात भगवा रायगडावरी
पाहतोय वाट झाला आतुर भेटण्या गड शिवनेरी
आहे आग्रहाचे निमंत्रण माझे
मराठा तितुका मेळवाया ...
यावे पुन्हा भूमंडळी राजे || 4||

## 3 . मनराज

दिनांक : 14 एप्रिल 2010

तरूण तडफदार नेतृत्वाची गरज आहे आज
तमाम मराठी मनांवर करता तुम्ही राज

जाहल्या मंत्रमुग्ध सभा, निर्भीड वक्तृत्वाने
घुमला नाद अस्मितेचा नभा, निश्चयी कर्तृत्वाने

केली परप्रांतीयानी घुसखोरी, बनले रोजगारात वाटेकरी
लागले ओढू हातची शिदोरी, उडाली धांदल भूमीपुत्रांची पुरी
बघते सरकार नाट्ये सारी, बांधुनि हात अधांतरी

गर्जला सिंह सह्याद्रीचा, फुटला कंप क्षितिजावरी
जागला स्वाभिमान ह्दयी, अस्मिता मायबोलीची अंतरी
देऊनि प्रेरणा युवाशक्तीला, नवनिर्माण महाराष्ट्राचे करी

पायओढी केली, प्रसारमाध्यमांनी जरी
न डगमगे स्थितप्रज्ञ, सडेतोड तयां उत्तरी
जनकल्याणाचा घेतला मनी ध्यास
नमले सरकार, ऐसा केला अट्टाहास

जिंकली मने स्पष्टवक्त्याने, विषयांचा सखोल अभ्यास
तरवारीपरी शब्द चालविले, मिळविले मातीत गनिमांस

जपला आपला मराठी बाणा
पसरली कीर्ती दाही दिशांना
धीर आला जनसामान्यांना
ऐसा शोभे राज मराठी मनांना

## ४ . काळ

दिनांक ः 2 मे 2010

कधी भरतो मनात हर्ष
शिकवितो कराया जीवन संघर्ष
कधी देतो मायेचा स्पर्श
घडवी नित्य उद्योग्याचा उत्कर्ष
म्हणती जन याला काळ
सृष्टीवर नजर सांजसकाळ
वृद्‌ध, तरूण असो वा बाळ
उमगली कुणा ना याची नाळ || 1||

बाळपणीचा काळ सुखाचा, कुशीत माईच्या लाडू मुक्यांचा
कौमार काळ बागडण्याचा, स्वैर मित्रांसंगे खेळण्याचा
यौवन काळ बेधुंदीचा, मनसोक्त जोडीदारासंगे भटकण्याचा
प्रौढ काळ जबाबदारीचा, पुरूषार्थ चारी साधण्याचा
वृद्‌धापकाळ नातवंडांसंगे, उणे बाळपण जगण्याचा || 2||

कालचा घडला इतिहास, चुकातून शिका सांगे भूतकाळ
आजचा प्रत्येक पळ, जगा पूर्ण लावून बळ सांगे वर्तमानकाळ
संकल्प करा उद्याचा, कराया स्वप्ने साकार सांगे भविष्यकाळ || 3||

दुर्जनांचा कर्दनकाळ, सज्जनांचा सुकाळ
घालुनिया गळा तुळशीमाळ
करावा गजर हरीनामचा
घेऊनिया हाती टाळ
वृद्ध, तरूण असो वा बाळ
समजुनि घ्या काय लिहिलेय भाळ || **4**||

मेणाहूनी मऊ कधी, कधी कापसाहून हलका
निवडुंगापरी काटेरी कधी, कधी पोपटासारखा बोलका
म्हणती जन याला काळ
सृष्टीवर नजर सांजसकाळ
वृद्ध, तरूण असो वा बाळ
बनुनि सखा पाठीराखा करतो मायेने सांभाळ || **5**||

कधी फिरतो वळू मोकाट
कधी धुंद ऐरावत मस्त
कधी भरधाव अश्व चुस्त
तीक्ष्ण नजर घारीपरी ठेवी सर्वांवर लक्ष्य
झडप घाली वाघापरी पकडाया भक्ष्य || **6**||

वेसन घालण्या ह्या वळू, सद्विचार मनी रूळवा

अंकुश ठेवण्या ह्या ऐरावती, सदाचार इंद्रियी वळवा

लगाम लावण्या ह्या अश्वी, सत्कर्म अंगी बळवा

उत्तुंग उडण्या ह्या घारी, सद्भावना प्राणीमात्री जुळवा

वश करण्या ह्या व्याघ्री, सदिच्छा मानवती कळवा || **7** ||

## 5 . तुझ्या येण्याने

दिनांक : 7 मार्च 2010

तोः

मदनगंध वा-यात मिसळला

प्रणयउमंग अंगात उसळला

दाटल्या कंठाला पाझर फुटला

हळुवार क्षण हे झाले तुझ्या कोमल स्पर्शाने

नंदादीप उजळले... तुझ्या येण्याने || धृ .||

स्पंदनतरंग दरवळले

सप्तरंगात विरघळले

आतुरलेले मन हरवळले

हळुवार क्षण हे झाले तुझ्या कोमल स्पर्शाने

शीतल चांदणे अवतरले... तुझ्या येण्याने || 1 ||

उजळली कांती कांचनी

लावण्य भरती लोचनी

ऐशा एकांत क्षणी येना जवळ साजनी

हळुवार क्षण हे झाले तुझ्या कोमल स्पर्शाने

सप्तसुर नभी विसावले... तुझ्या येण्याने || 2 ||

स्वप्न असे की मृगजळ हे
आभास तर नव्हे ना, कैसे मज कळे?
मनचातक चिंब न्हाले पहिल्या धुंद सरीने
हळुवार क्षण हे झाले तुझ्या कोमल स्पर्शाने
घनामृत बरसले... तुझ्या येण्याने || **3** ||

तीः
मी तुझीच जाहले ज्याक्षणी तुज पाहिले
मिलनाच्या ओढिने मनीमन हरकले
घेना मिठीत सामावुनि आता सर्व तुज अर्पिले
हळुवार क्षण हे झाले तुझ्या कोमल स्पर्शाने
मेंदीच्या पानांवर नक्षत्र उमटले... तुझ्या येण्याने || **4** ||

तोः
येना प्रिये तू अशी जवळ माझ्या राहा
न राहील भान कसले, अशी डोळयांत पाहा
कसे सांगू किती सौख्य मज लाभले
हळुवार क्षण हे झाले तुझ्या कोमल स्पर्शाने
स्वप्न अंतरीचे साकारले... तुझ्या येण्याने || **5** ||

## 6 . तू समीप येता

दिनांक : 3 जून 2010

तू समीप येता, दीप मनी मिणमिणले
धुंद गंधीत वारे हळूच कानी गुणगुणले

तू समीप येता, घंटा मंदिरी किणकिणल्या
निरभ्र काळोख्या नभी टपोर चांदण्या टिमटिमल्या

तू समीप येता, श्रावणधारा रिमझिमल्या
हर्षोल्हासित मयूरपिसारा पाहुनि लांडोर्‍या थुईथईल्या

तू समीप येता, जीभ शब्दांत अडखळली
काळजातली गुपीतगाणी नयनांतुनि दरवळली
सागरा भेटावया सरिता सरसावुनि कळवळली
मिलिंदा भेटावया सुमने कळयांची हरवळली

तू समीप येता, वाटे जग सारे नवे
तू समोर अशी राहा सौख्य हेचि मला हवे

तू समीप येता, आवेगली स्पंदने

वाटे मिठीत घ्यावे तोडुनि सारी बंधने

## 7 . विरहयातना

दिनांक ः 6 मे 2010

नाही विसरू शकणार कधी
तुला अन् तुझ्या आठवणींना
नाही मिटवू शकणार कधी
ह्दयात जपलेल्या साठवणींना
हरवलीय तुजवीन जगण्याची चेतना
कधी भेटशील पुन्हा . . .
असह्य झाल्यात तुझ्या विरहयातना || धृ .||

न सांगता सोडून गेलीस
अशी अचानक पाठ फिरवलीस
जीव माझा ठेवून ओलीस
काय मिळाले तुज सांगना
कधी भेटशील पुन्हा . . .
असह्य झाल्यात तुझ्या विरहयातना || 1 ||

नाही पाठविलीस चिठ्ठी, ना धाडलास निरोप

विसरलोय तहान-भूक गमवलीय झोप

नाही पाठविलीस ईमेल, ना केलास फोन

तुजविन सावरे मज दुसरे कोण

सखे, कशा पोहचवू माझ्या भावना

कधी भेटशील पुन्हा . . .

असह्य झाल्यात तुझ्या विरहयातना || **2** ||

काय चूक झाली माझ्या हातून

सुकलाय कंठ बसलाय दाटून

दिलीस अश्रूंची माळ, गेलय काळीज फाटून

प्रिये कशी विसरलीस सोबतच्या सोनेरी क्षणांना

कधी भेटशील पुन्हा . . .

असह्य झाल्यात तुझ्या विरहयातना || **3** ||

स्पंदनात घुमतेय नाव तुझे

डोळ्यांत दिसती भाव तुझे

श्वासांत दरवळे गंध तुझा

हातांवर मखमली स्पर्श तुझा

मिटल्या पापण्यांवर उमटती गुलाबी घटना

कधी भेटशील पुन्हा . . .

असह्य झाल्यात तुझ्या विरहयातना || **4** ||

नाही विसरू शकणार कधी

तुला अन् तुझ्या आठवणींना

नाही मिटवू शकणार कधी

ह्दयात जपलेल्या साठवणींना

प्राणप्रिये अधुरा आहे मी तुझ्याविना

ये लवकर नि सावर . . .

असह्य झाल्यात तुझ्या विरहयातना || **5** ||

## ८ . यशकळस

दिनांक : 10 एप्रिल 2010

पहिल्या पायरीवरून यशाच्या कितीवेळा मी पडू
डोळे ऊघडुनि पाहू कसे आवरेना मज रडू

गमविलेला आत्मविश्वास कुठे कसा शोधू?
गलितगात्र झाल्यासारखे विचारही झाले अधू

अंधाराच्या जाळ्यामध्ये मती झोपली गाढ
विना प्रकाशसंश्लेषन कशी होईल वाढ?

कधी कुठेतरी मनामध्ये जागेल का आशा?
देवजाने कधी उगवेल किरण दाखवाया दिशा

कितीवेळा केला प्रयत्न पेटवाया वात
न्यूनगंडाच्या दोरीने बांधले माझे हात

जमेल की ना जमेल होई अशी द्विधा
काय म्हणतील लोक, देतील कशी शिधा

आता हे पुरे झाले माझे नशीबाला कोसने
जे काही पदरी पडेल ते निमुटपणे सोसने

घेतला मी दीर्घ श्वास,  घ्यावया उत्तुंग झेप
तोडुनिया बंधने सारी,  करेन मुक्त ही जन्मठेप

उघडल्या मी साऱ्या खिडक्या
उघडले दरवाजे सारे
व्यापुदे स्वच्छंद वारे
माझ्या मनाचे गाभारे

नाही पसंत मला असले कुढत कुढत जगणे
घ्यायची आहे उंच भरारी जिंकायाला गगने

खूप केली व्यथा खूप कुरवाळिले दुःखासि
नवी उमेद उगवली चालावया प्रकाशि

जिद्दीने मिळते सिद्धी झटकुनि आळस
वाढेल आत्मविश्वास चंद्रकलेने
गाठायचाय . . .  "यशकळस"

## 9 . अर्थाविना काही अर्थ नाही

दिनांक : 07 मार्च 2010

करी फत्ते काम जेव्हा करी पडे दाम
मिळे मोठे नाम जेव्हा मिळे मोठा दाम

लाभेल उद्या आराम जर आज लाभेल दाम
आयुष्यातील व्याकरणाला हाच देई पूर्णविराम .

द्रव्य देऊन घेतल द्रव्य तरी द्रव्याची तहान भागत नाही
वीस लाखाचा बांधला बंगला तरी विसावा मात्र मिळत नाही

शंभराची नोट झाली रूपायाएवढी
जेव्हा डोक्याचे गेले अन् पिकली दाढी

अर्थार्जन जरी असला पुरूषार्थ दुसरा
याच्या मोहात पडला बाकी सगळे विसरा

गुंतविता ह्याला सुटेना हा गुंता
चितेपरी जाळी मज ह्याची चिंता

ऐशी आहे आपल्या नेत्यांची ख्याती
जनतेला हे लुबाडुन खाती
स्विझला हवी भरभरून खाती

पैशाचा जो झाला दास
गोड न लागे त्याला घास

ठेवण्यास ठेव केली नसती उठाठेव
शेंदूर फासला दगडास अन् पावला की हो देव

वित्त वित्त करता संचय हरवले चित्त
खवळायाला पित्त लागे क्षुल्लक निमित्त

आहेत दात तोवर खाऊया चणे
बाकी उरते शून्य करता यास ऊणे

पैसा नाही लागत झाडाला अन् पिकत पण नाही पाडाला

कामे करी फटाफट फेकल्यावर बंडल
थोबाड होई सटासट मारल्यावर सॅंडल

ज्याच्या हाती पैसा त्याला पुसती नाती
काय उपयोग दरिद्रयाची  जरी असली सुपीक माती

पैसा मुळी गैर लावी भावंडात वैर
अरे सोडा पिसा हा भ्रम
अन् खोला खिसा गरम

हाच असतो कारण रावराब राबण्याला
हाच बनतो सारण चाल बोल वागण्याला
अर्थ असेल तरच अर्थ ह्या जगण्याला
अर्थाविना काय अर्थ फुकटचे मरण्याला

## 10 . आम्ही लय भारी

दिनांक ः 03 मार्च 2010

तोड नाही जोड नाही लाईफचा काही लोड नाही
तोल नाही मोल नाही लाईफचा काही झोल नाही
किती आले किती गेले बारा गावचे पाणी पिले
झाले त्यांचे स्क्रू ढिले पाहूनि आम्हा दुनिया बोले
हेऽऽऽ आम्ही लय भारी || धृ .||

आपुनका स्टाईल है रॉयल
कमॉन बेबे देदे तू स्माइल
Action speaks louder than words
Sky is the limit we are flying birds
Hey dude, No Hurry, No Worry
Well Said… आम्ही लय भारी || **1** ||

“ही पोरं लय भारी
ह्यांची किमया लय न्यारी
ह्यांचा रूबाब मनात ठसला ना
ह्ययांचा थाट काय सांगू
ह्यांची ऐट काय सांगू
माझ्या आनंद ऊरात माईना”

सूर्याचे घेऊनि तेज अन् चंद्राची शीतलता

जिंकायाला मने सारी नाही कसली कमतरता

प्रतिभेचे वैभव लाभले भेदूनि टाकाया क्षितिजे सारी

म्हणतात ना . . . देवतारी त्याला कोण मारी

जय होऽऽऽ आम्ही लय भारी || **2** ||

राईटसाठी फाईट करू

सत्यासाठीच लढू

नादी नका लागू कुणी

नका कुणी नडू

ऐऽऽऽ क्या बोलता है भिडू

तुमसे बढकर कौन

यारा तुमसे पयारा कौन

सलाम करे ये दुनिया सारी

सही हैऽऽऽ आम्ही लय भारी || **3** ||

डर नाही कसला नाही कुणाची भीती
उपटुनिया टाकू सा-या खुळ्या चालीरीती
लाटेवरती आव्हानांच्या होऊनिया स्वार
पसरवू कीर्ती आता साता समुद्रापार
उद्योग्याच्या घरी ऋद्धी सिद्धी पाणी भरी
बरोबर बोललाऽऽऽ आम्ही लय भारी || **4**||

वादळाशी झुंज देऊ करू तुफानाचा सामना
आमच्याशी हात मिळवा आमचा आहे जमाना
मिळे शक्तीला युक्तीची जोड
मोडून टाकू शत्रूची खोड
साम दाम दंड भेद
योजूनि शस्त्रे चारी
राहा सावधानऽऽऽ आम्ही लय भारी || **5**||

## 11. शिनेमाला घेउन चला

दिनांक : 18 मार्च 2010

येता जाता तुम्हाला पाहता गेले कशी मोहुनि

रूबाब तुमचा काळजात घुसला घायाळ जशी हरिणी

झाले तुमावर फिदा साजना जीव तुमावर जडला

आन् सातारयाच्या टाकीला नवा शिनेमा लयी गाजला

अहो राया मला शिनेमाला घेऊन चला || धृ.||

चला ना राया . . .

हिला घेउन जावा शिनेमा दावा

एवढी हौस हिची पुरी करा

तुमासाठीच आले शिनगार करून

नका नका तुमी जावू आस दूरून

बघा बघा लावण्य डोळ भरून

आन् मिरवाकी मला हात धरून

आता सुगीचावी हंगाम सरला

जातेय बाजारला सांगितलय घरला

अहो राया मला शिनेमाला घेऊन चला || 1 ||

चला ना राया . . .

हिला घेउन जावा शिनेमा दावा
एवढी विच्छा हिची पुरी करा

टाकते प्रत्येक पाऊल मी जपून
टपल्यात शिकारी मोक्यावर लपून
बसती पाखरं फाश्यात अडकून
पडत्यात कित्येक ईश्कात धडकून
नाही घावायची अशी तशी कुणाच्या इशाऱ्याला
अहो राया मला शिनेमाला घेऊन चला || **2** ||
चला ना राया . . .

हिला घेउन जावा शिनेमा दावा
एवढा लाड हिचा पुरी करा

नवा शिनेमा टाकीला लय गाजला

हिरो दिसतो तुमावानी देखणा

विलन हाय वाईच हेकना

हिरॉइनबी माझ्यावानी हाय चिकनी

बसु बाल्कनीमंदी दोघ बिलगुनी

इंटरवलला पॉपकॉर्न द्या खायला

गरम झाल्यावर पेप्सी पाहिजे प्यायला

येईल गमजा शिनेमा हाय लय चांगला चांगला चांगलाऽऽऽ

अहो राया मला शिनेमाला घेऊन चला || **3** ||

चला ना राया . . .

हिला घेउन जावा शिनेमा दावा

एवढी मौज हिची पुरी करा

## 12 . डचळांग मचळांग

दिनांक ः 18 एप्रिल 2010

शिट्टी...

डचळांग मचळांग डचळांग मचळांग डचळांग मचळांग डांग || धृ .||

आगं हरिणीवानी चाल तुझी करी जीवाचे हाल... हाय हाय

मागे वळूनि पाहू लागलो काय जादू केलीस सांग

आणि काळीज माझं ऊडू लागलंऽऽऽ

डचळांग मचळांग डचळांग मचळांग डचळांग मचळांग डांग || 1 ||

वाटेवरती तारूण्याच्या चालली मादक मोहिनी

जशी कोरीव लेण्यातून प्रगटली रूपवान कामिनी

नको चालूस किनाऱ्यावरी उचंबळला सागर अथांग

आणि काळीज माझं ऊडू लागलंऽऽऽ

डचळांग मचळांग डचळांग मचळांग डचळांग मचळांग डांग || 2 ||

नितळ काया, सतेज कांती डोळे दिपवुनि टाकति

लुकलुकनारे नयननक्षत्र बरच काही सांगुनि जाती

नको हसू गालात, चिंब भिजले माझे सर्वांग

आणि काळीज माझं ऊडू लागलंऽऽऽ

डचळांग मचळांग डचळांग मचळांग डचळांग मचळांग डांग || 3 ||

गालावरची बट रूळलेली मिलनाचे करी इशारे

रोज नवेसे रूप हवेसे , पाहुनि लाजली फुलपाखरे

ऐकुनि पैंजनि मंजुळगाणी गुंगलो चढली भांग

आणि काळीज माझं ऊडू लागलंऽऽऽ

डचळांग मचळांग डचळांग मचळांग डचळांग मचळांग डांग || **4** ||

अशी चाललीस कुठे हळुहळु

जीव लागलाय इथे घुटमळु

नको लचकुनि मुरडुनि छळु

जरा जपून नको तोल ढळू

तोरा पाहून लागलीय चाहत्यांची रांग

आणि काळीज माझं ऊडू लागलंऽऽऽ

डचळांग मचळांग डचळांग मचळांग डचळांग मचळांग डांग || **5** ||

## 13 . म्हणी असाव्या मनी

दिनांक : 20 मार्च 2010

लोकासांगति ब्रह्मज्ञान स्वतःमात्र कोरडे पाषाण
खणू नये विहिर लागल्यावरति तहान

येड्यांचा बाजार अन् पेढ्यांचा पाऊस
मुळासकट खाऊ नये गोड लागला म्हणून ऊस

जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही
सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही

ढवळया शेजारी बांधला पवळया वाण नाही पण गुण लागला
चार आण्याची कोंबडी अन् बार आण्याचा मसाला

बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी
रोज रोज मरी त्याला कोण रडी

असतील शिते तर जमतील भुते
अंधळे दळते अन् कुत्रे पीठ खाते

इळं मोडन केल खिळं
यळला केळ अन् उपासाला शिताफळ

हुत्याच नव्हत अन् जित्याचा महाळ

खायला काळ अन् भूईला भार

## 14 . पोतराज आला

दिनांक ः 21 मे 2010

दार उघड बये दार उघड

सकाळच्या पारी निघालीया स्वारी
आली आली मरीआय तुझिया दारी

दार उघड बये दार उघड
ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग  ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग

मरीआयचा लयी कडक आवाज
तिचा लाडका भक्त पोतराज
कसा दिसतो भयावह अवतार
लांब लांबल्या जटा डोईवर
मळवट कुंकवान माखला
रंगबेरंगी वस्त्र कमरेला
झुले आईची गळयात माळ
वाजे पायांत घुंगर चाळ
कैसा आसूड कडाडे अंगावर
ऐसा निनादे उठे शहार

नाचती पाऊले तालावर

घेई गिरक्या गरगर डोलावर

दार उघड बये दार उघड

ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग  ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग

आला आला मरीआयचा गाडा

धनधान्य पदरामंदी वाढा

सुटेल जन्म मरणाचा तिढा

टळतील साऱ्या ईडापिडा

नवस आईला तुमी सांगा

काही हव आसल ते मागा

आय येते धावुनि हाकेला

पुसते भक्तांच्या तहान भुकेला

करते रक्षण संकटसमयाला

माझे नमन मरीआईला

दार उघड बये दार उघड

ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग  ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग

मरीआयचा रूद्र अवतार
आहे कडक नजर तळपदार
दुष्ट पापांचा तिला तिरस्कार
भगताचा करी स्वीकार
दुर्जनांचा उडे थरार
ऐसा पडे आईचा प्रहार
सज्जनांचा करी उद्धार
घे आई माझा नमस्कार

दार उघड बये दार उघड
ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग  ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग
ऊबूबूबूऽऽऽ बूबूऽऽऽ बूऽऽऽ आहाऽऽऽ

मरीआयचा लयी कडक आवाज
तिचा लाडका भक्त पोतराज
कैसा आसूड कडाडे अंगावर
ऐसा निनादे उठे शहार

दार उघड बये दार उघड

ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग  ड्रॉंग रॉंग रॉंग रॉंग

## 15 . नाती

दिनांक ः 23 मे 2010

नाती म्हणजे नाती असतात

एकाच समईत उजळणाऱ्या वाती असतात

अंधारावर मातून जागणाऱ्या राती असतात

वाऱ्याशी झुंजुन मिणमिणनाऱ्या ज्योती असतात

नाती म्हणजे नाती असतात

तळहाताचा करूनि पाळणा जोजावणाऱ्या आई असतात

वात्त्सल्याने वासराला कुरवाळणाऱ्या गाई असतात

ताडुनि खोडकर कान्हाला

मिठीत घेणाऱ्या यशोदामायी असतात

पाजुनि स्वाभिमानामृत शिवबाला

स्वराज्य घडविणाऱ्या जिजाबाई असतात

बीज अंकुरे वृक्ष बहरे

जोपासणाऱ्या जन्मदात्री असतात

नाती म्हणजे नाती असतात
देह दोन वेगळे असुनि
स्पंदने मात्र एकच असतात
सुमनांनी भ्रमरासाठी साठवलेल्या
माधुर्यवाटी असतात
कामदेवाने रतीसाठी बांधलेल्या
रेशीमगाठी असतात
घेउनि सात फेरे हाती
साथ राहूदे जन्म साती
मागणाऱ्या सावित्री असतात

नाती म्हणजे नाती असतात
रेशमी धाग्यात गुंफलेले मोती असतात
असल्यावर एकत्र, शोभा उजळती असतात
इतस्ततः विस्कटल्यावर मोल मात्र माती असतात
पुन्हा नव्याने गुंफणारी मने मात्र मोठी असतात

नाती म्हणजे नाती असतात
पाची बोटे एका हाताची
एकसारखी कधी नसतात
एक होउन झुंजायाला
बळकट मुठी तेच बनतात
झेलायाला बिकट आव्हाने
तयार निधड्या छाती लढतात

नाती म्हणजे नाती असतात
एकमेकांपासून दुरावले तरी
मायेच्या ओढीने जोडत असतात
रागद्वेष हेवेदावे
गंगेला सोडत असतात
जवळ असल्यावर मनामध्ये
कसल्याही भीती नसतात

आई बाबा आजी आजोबा

दिसले मला रूक्मिणी विठोबा

दादा वहिणी काका काकी

दिसले मला राम जानकी

मामा मामी आत्त्या मावशी

इथेच वसते मथुरा काशी

मुले सुना नातवंडे

प्रेम भरभरून ओसंडे

## 16. Remember you

दिनांक ः 27 मार्च 2010

I remember you, remember you,
remember you very much
तुझको ही चाहूं ना तुझबिन रहूं यही है सच

गुलशन में खिलती है कलियाँ तेरे मुस्कानेसे
विरानें में बहती है नदीयाँ तेरे गुनगुनानेसे

I remember you, remember you,
remember you very much
तुझको ही चाहूं ना तुझबिन रहूं यही है सच

ऑंखों में सपने तेरे भरें नयी उमंगे
भूला मैं अपने सारे उठी ऐसी तरंगे

I remember you, remember you,
remember you very much
तुझको ही चाहूं ना तुझबिन रहूं यही है सच

पाऊँ मैं सबकुछ तू जो देदे मेरा संग
सिनेसे लगाके मुझको रंग दे मेरा अंग

I remember you, remember you,

remember you very much

तुझको ही चाहूं ना तुझबिन रहूं यही है सच

गाते हैं फूल सारे गुनगुनाते क्या भंवरे सुन

आँखों में तेरा ही नशा होटों बस तेरी धुन

I remember you, remember you,

remember you very much

तुझको ही चाहूं ना तुझबिन रहूं यही है सच

तेरीही यादों में डूबा हूँ खोया खोया

दिनको ना आये चैन ना रातों मे सोया

तुझको ही दिल पुकारे आ मुझको मिल Come soon

Missing you, waiting for you in this lovely full moon.

I remember you, remember you,

remember you very much

तुझको ही चाहूं ना तुझबिन रहूं यही है सच

## 17 . आये खुशियों के पल

दिनांक : 19 एप्रिल 2010

यारों क्यों बैठे हो बोर

फिक्कर नॉट कमॉन द फ्लोर

दिलको बांध के दिलकी डोर

मस्तीमे झूमो मचाओ शोर

दम लगाके पुरा जोर

नाचो गाओ चारो ओर

जीलो आजमे सही होगा कल

चलचल गा आये खुशियों के पल || धृ .||

We are born to dance

We are born to romance

Live every moment as if no another chance

Bebby, Look into my eyes like love birds

Hug me tight just feel my words

कंधे को कंधो पे मल

चलचल गा आये खुशियों के पल || 1 ||

हाथों मे लेले उसका हाथ

हो होटों पे बस उसकी बात

डूबजा ऑखों मे सारी रात

होगी दुबारा ना मुलाकात

धीरज के है मीठे फल

चलचल गा आये खुशियों के पल || **2** ||

कलकी फिकर मत कर आज

बनेगी कामयाबी सरपे ताज

खोलदे सारे दिलके राज़

होगा सबको तुझपे नाज़

मिलेगा हर मुश्कीलका हल

चलचल गा आये खुशियों के पल || **3** ||

यारों क्यों बैठे हो बोर

फिक्कर नॉट कमॉन द फ्लोर

ये दिल मांगे वन्स् मोर

फ्रन्टफूटपे उठाले फोर

बाहों में भरले उडने का बल

चलचल गा आये खुशियों के पल || **4** ||

## 18 . हरिनामसंकीर्तन

दिनांक : 18जून 2010

कोण मी ?  कोण मी ?

कुठुन मी आलो ? कुठे मी चाललो ?

काय माझे श्रेय ? काय माझे ध्येय ?

गोंधळल्या मना किती पडती प्रश्न

केली सुलभ वाट हरिनामसंकीर्तन

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे |

हरे राम हरे राम राम राम हरे हरे || **1** ||

अंश परमात्म्याचा प्रत्येक जीवात

गुणधर्म गोड सूक्ष्म साखरेच्या कणात

हरिनाम नाही हरिहून वेगळे

एक सूर्य प्रकाशी जसे विश्व सगळे

सत्ययुगे करती तपस्या घोर

मिळवाया शांती पहावया ईश्वर

त्रेतायुगे करती यज्ञयाग महंत

लाभावया फलप्राप्ती भेटावया भगवंत

द्वापारयुगे करती मंदिरपूजा सदैव

करावया कार्यसिद्धी व्हाया प्रसन्न देव

कलियुगे भगवंत झाला कृपाळु

हरिनामसंकीर्तन साधन दयाळु

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे |

हरे राम हरे राम राम राम हरे हरे || **2** ||

देहाच्या रथाला अश्व पंचेंद्रियांचे ओढती

यात्री जीवाला बुद्धी झाली सारथी

धावे सैरावैरा होता विषयासक्ती

मन लगामाचे दोर अश्वांना नियंत्रती

बुद्धी आणि मन होता संलग्न

सेवेत भगवंताच्या देह होतो मग्न

घडे जीवा दिव्य साक्षात्कार

दिसे सुस्पष्ट विश्वरूप ॐकार

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे |

हरे राम हरे राम राम राम हरे हरे || **3** ||

भूकेल्या देहा भासे गरज अन्नाची
उदरभरता पोषण होई अवयवांची
वृक्षवहरे जेव्हा मुळे शोषती पाणी
तहानलेल्या जीवा चैतन्य हरिनामसंकीर्तनी

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे |
हरे राम हरे राम राम राम हरे हरे || **4** ||

क्षणार्धात सहस्त्र विचार डोकावती मनी
चंचल मना घडे ब्रह्मांड भ्रमंती
येता झुळुक वाऱ्याची मिणमिणते का पणती
स्थितप्रज्ञ तोचि हरिनामसंकीर्तनी

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे |
हरे राम हरे राम राम राम हरे हरे || **5** ||

मतितार्थ गीतेचा जाणून घ्यावा
विळखा मोहमायेचा तोडुनि टाकावा
नित्य सत्वगुण अंगीकारावा
मिथ्य अहंकार मागे सारावा
सदा हरिनाम मुखी असावे
सर्वदा हरिरूप चित्ती स्मरावे

होई कर्मशुद्धी सर्वचिंतामुक्ती
पसरे सभोवताली दिव्य धनशक्ती
होई स्थिरबुद्धी सर्वभयमुक्ती
करे नष्ट दुष्ट ऋणशक्ती

एकाग्रचित्ते शुद्धविचारे
हार्दिक भक्ते शुद्धउच्चारे
नित्य सराव हरिनामाचा करे
तया सदैव खुली वैकुंठद्वारे

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे |
हरे राम हरे राम राम राम हरे हरे || 6 ||

## 19 . मेघश्यामल रिमझिमले

दिनांक ः 25जून 2010

वाढला उष्मा ग्रीष्माचा, सरला मास ज्येष्ठाचा
ऊन मध्यान्हाचे माथ्यावर शिरवळले
पाऊल चार नकळत तिकडे वळले

मोकळया नभात, घन अचानक गजबजले
श्यामल मेघांना, वारे गार कुजबुजले

पहिली वहिली सर धरणीवर बरसली
निःश्वास तृप्तीचा घेउनि मृद्‌गंधीत झुळुक दरवळली
आसुसलेली झाडे वेली पाने फुलेही चिंब न्हाली

माथ्यावरचे रान भिजले, शिवार सारे झाले ओले
भिजलेले दोन पक्षी, एका फांदीवर विसावले
पंखावरची ओली नक्षी, एकमेकां पाहुनि सुखावले

पहिल्या सरीचे पहिलेच थेंब, गालावर तिच्या ओथंबले

बनूनि मोती काही त्यातले, स्पर्शाने तिच्या ओघळले

वाटले टिपावे उरलेले, प्राशावे अमृत सगळे

पाहुनि अंग भिजलेले, मन माझे मोहुनि गेले

मोकळया केसांना अलगद, हळुवार तिने झटकले

मिटुनि डोळे, घेऊनि श्वास, रोमरोमांनी माझ्या प्यायले

लाजलेल्या नजरेने, हळूच तिने मज पाहिले

गुपीत सगळे मनातले, सहज मला उमगले

श्यामल चंचल मेघ फिरून पुन्हा रिमझिमले

दाट घनांच्या गर्दीतून रवीराजे डोकावले

साक्ष प्रीतीची द्यावया, इंद्रधनु प्रगटले .

## 20 . डॉली

बालगीत

दिनांक : 26 जून 2010

डॉली ग डॉली छान माझी बाहुली
कपाळी टिकली, छान छान लावली
काळे कुरळे केस, गुबरे गुबरे गाल
गोरी गोरी पान, ओठ लाल लाल

डॉली ग डॉली छान माझी बाहुली
सानुली छकुली, इवलिशी चिमुकली
साजिरी गोजिरी जराशी लाजरी
गुदुगुदु पोटावरी, खुदकन हसली

डॉली ग डॉली छान माझी बाहुली
गोड गोड दिसते मायेची सावली
हलकी फुलकी, फुलांची पालखी
चालकी बोलकी, खूप खूप लाडकी

डॉली ग डॉली छान माझी बाहुली
चिऊताई, हंबागाई भेटायला आली
चल चल खेळायला खेळणी मांडली
अग अग जपून, वाटी दूधाची सांडली

डॉली ग डॉली छान माझी बाहुली
उगी उगी रूसली, शहाणी माझी तानुली
आई गेलीय बाजारला, खाऊ सांगितलाय आणायला
बाबा गेलेत ऑफिसला, जाऊ संध्याकाळी फिरायला

डॉली ग डॉली छान माझी बाहुली
गालवरची खळी, आता कशी खुलली
साजिरी गोजिरी जराशी लाजरी
गुदुगुदु पोटावरी, खुदकन हसली

## 21 . मराठा

दिनांक ः 03 जुलै 2010

मोडेन पण वाकणार नाही
संपलो बेहत्तर झुकणार नाही
स्वाभिमानी बाणेदार
स्वावलंबी इमानदार
बलभीम यष्टी पीळदार
मस्तकी युक्तींचा साठा
ऐसा मी मराठा

शौर्य मनगटात माझ्या ह्दयी दयेचा ठोका
मन धीट माझे कणखर माझा मणका
चित्तथरारक कर्तबगारीने
काढतो गनिमाचा काटा
ऐसा मी मराठा

मायभूमीच्या रक्षणासाठी मायबोलीच्या जतनासाठी
लावतो प्राण पणाला
भगव्याचा मी सच्चा भक्त
सळसळते धमन्यांत युवा रक्त

चिरूनि समुद्राच्या लाटा

जिंकतो साऱ्या बिकट वाटा

ऐसा मी मराठा

वारकरी भजतो विठोबाचा

मावळा लढतो शिवबाचा

अंतरी नांदते सदा

ज्ञानेश्वरी अन् गाथा

ऐसा मी मराठा

## 22 . गुढीपाडवा

दिनांक ः 04 जुलै 2010

आला आला गुढीपाडवा
कडुनिंबा लागे अमृताचा गोडवा

चला चला ग सयांनो
अंगणी टाकू सडा
रंगबेरंगी रांगोळी काढा
चौकटीला नक्षी चंद्रकोराची
अन् स्वस्तिक कोरा
नेसुनि शालू नवा
लेवू हिरवा चुडा

नव्या वर्षाचा नवा उमंग
नव्या हर्षाचा नवा तरंग

आला आला वसंत नटून
दिसे पिंगारा उठून
गुलमोहर कसा फुलला
उल्हास मनामनांत खुलला

आले श्रीराम अयोध्या

स्वागत हार्दिक करूया

विजयध्वज गुढी उभारूया

नैवेध्य पुरणपोळीचा करूया

साडेतीन मुहुर्तात एक

होऊदे शुभकाम प्रत्येक

सौभाग्य लाभुदे पदरी

सुखसमृद्धी नांदुदे घरी

केले आजच्या दिनी विश्व निर्माण ब्रह्मदेवाने

केली आजच्या दिनी सुरू कालगणना राजा शालीवाहनाने

आला आला गुढीपाडवा

कडुनिंबा लागे अमृताचा गोडवा

## 23 . पहिली नजर

दिनांक ः 04 जुलै 2010

कॉलेजच्या कट्टयावर गप्पांच्या गठ्ठयावर

दंगला होता मित्रांचा ग्रुप

रमत नव्हते मन माझे

उमगत नव्हते काय करावे

कुणास ठाऊक काय शोधत होते

वाट कुणाची बघत होते

लेवुनि रूप नवेनवे आले कुठुनि फुलपाखरू

पहिली नजर नजरेला भिडली

प्रीतस्पंदने अजुनि आवेगली

मनातल्या मनात म्हटले मन

वाह! किती निर्मळ तन, किती सुंदर रूप

जीभ मात्र राहिली चूप

हर्षले मन आनंदले खुप

आधी ना घडले कधी

उचंबळले ना काळीज कधी

पहिल्या नजरेतल पहिल प्रेम

पहिल्या पावसाचा पहिलाच थेंब

गंधीत झाला स्वैर वारा

रंगीत झाल्या टिमटिम तारा

वरसल्या रिमझिम श्रावणधारा

पहिल्या नजरेचा पहिला इशारा

## 24 . मैत्री

दिनांक ः 04 जुलै 2010

उमलती कमलपुष्पे रवीच्या उदयाने

उचंबळतो अथांग सागर शशीच्या सहवासाने

न सांगता उमटती भाव मनातले नेत्री

धन्य जाहलो लाभली तुझी निरागस मैत्री

आवडीने पोहे कृष्ण सुदाम्याचे खातो

हाकेला निःस्वार्थपणे धावतो

पार्थाला समयी उपदेशतो

हाकतो तो रथ क्षेत्री

धन्य जाहलो लाभली तुझी निरागस मैत्री

मैत्री म्हणजे ऐश्वर्य सगळे

मैत्रीविना व्यर्थ हे जगणे

कुशीत पर्वतांच्या आकाश झुकते

मेघांसंगे वारे स्वैर धावते

जीवनप्रवासात तुझीच साथ यात्री

धन्य जाहलो लाभली तुझी निरागस मैत्री

सुखदुःखात सामील होशी

फळे गोमटी वाटून खाशी

पूरक परस्परांना असशी

भांडशी फिरूनि गळे भेटशी

येशी धावुनि मदतीला दिवसा वा रात्री

धन्य जाहलो लाभली तुझी निरागस मैत्री

## 25 . राजकारण

दिनांक : 05 जुलै 2010

विनाकारण केले जाते त्याला राजकारण म्हणतात

कारणासाठी काही न करणे यालाही राजकारण म्हणतात

राजकारण नसते तर काय महाभारत घडले नसते

राजकारण असते तर काय रामायण अडले असते

जगण्याच्या शर्यतीत कोण कुणाला ढकलतो

कुणाची तंगडी कोण बरे खेचतो

उगीच कुणाचा चिमटा का काढतो

तुझ्यापेक्षा मी श्रेष्ठ कसा दाखवतो

आयुष्याच्या करंजीत काय कमी होते सारण

दिसते तसे नसते असते फक्त राजकारण

कधी कोण कुणाला येईल शरण

कधी कोण कुणाचे करेल वस्त्रहरण

तिकीट मिळाल्याशिवाय येईल कसे मरण

अडला हरी धरी गाढवाचे चरण

सुसंस्कृत समाजाला हवय कशाला राजकारण

द्यूताचे पडती उलटे सुलटे फासे
खाऱ्या पाण्यात पोहती गोड्या पाण्यातले मासे
बुद्धीबळाच्या पटावरचा राजा का घाबरतो
तिरक्या चालीने उंट का चालतो
सरळ रेषेत चालूनही प्यादा का मरतो
सर्वशक्तीयुक्तीनिशी वजीर का लढतो
नेत्रपटलांवर दूरदृष्टीचा पडल्यावर किरण
जिंकण्यासाठी परत शस्त्र बनते राजकारण

ज्याची सत्ता त्याला मिळे भत्ता
विकासाच्या आराखड्याचा नाही थांगपत्ता
हडपली जनतेची सारी मालमत्ता
आश्वासनांच्या गाजरांचा कुंटला खलबत्ता
व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रकती तितकी धोरण
येरागाबाळयाचे काम नव्हे हे राजकारण